CM32.1
T45



1895
Tila

To

Dear Mrs Hume
With respects

From
Her dutiful & affectionate
Brother in Christ

Bombay N. V. Tilak
24-12-95

PITTS
THEOLOGY
LIBRARY

EMORY UNIVERSITY
ATLANTA, GEORGIA 30322




# ख्रिस्तजयंतीची

## भेट.

मी जगाचा उजेड आहें, जो
मला अनुसरेल तो अंधारांत
चालणारच नाहीं, तर त्याला
जीवनाचा उजेड मिळेल.

124561

# अर्पण.

## पद.

ईषत्फुल्ल कळी सुमती। प्रेमो-
द्यानीं जी रमती ॥ नाहीं ठा-
उक कवणातें । सौरभ अ-
जुनी हृदि धरिते । अन्तर्नि-
गूढसौभाग्या । मन्मन वेधाया
योग्या। चाल। खिस्तपदीं रत,
कविला अभिमत, गुण जीचे
असती । मन्मति तिज हें
अर्पीती ॥ १ ॥ ईषत्फुल्ल ॥

जगन्मित्र.

# प्रस्तावना.

## पद.

कुणितरी ॥ ध्रु० ॥

कुणि तरी गाउनी दावा तच्चरिताला ॥
कीं काढा पाहूं हुबेहूब चित्राला ॥ १ ॥
कुणि तरी, हो कुणि तरी ॥

या ! सांगा मज त्या दयासागराची ॥
किति लांबी रुंदी किती खरोखर उंची ॥ २ ॥
कुणि तरी, हो कुणि तरी ॥

ज्या अस्त न जो हें विश्व व्यापुनी राहे ॥
त्या कथा प्रकाशा उपमा कसली या ! हें ॥ ३ ॥
कुणि तरी, हो कुणि तरी ॥

तें प्रेम कसें तें सांगा बघुं शब्दांहीं ॥
जें नामरूपगुण पतित नरास्तव वाही ॥ ४ ॥
कुणि तरी, हो कुणि तरी ॥

या ! कविरायांनों धुवुनि ओष्ठहृदयाला ॥
या ! गाऊं गाणें तया ख्रिस्तरायाला ॥ ५ ॥
कुणि तरी, हो कुणि तरी ॥

# नित्योदिततारक.

## भूपाळी.

पहा! पहा! तारक हा ।
रविशशिह्नुन थोर उदित झाला ॥ ध्रु० ॥

रविसम हा तीव्र नसे ।
पांडुर शशिसम न दिसे ।
यास बघुन सृष्टि हसे ।
जीव जिचा धाला ॥ ध्रु० ॥ १ ॥

दिग्वधुचें मुख निवळे ।
घोरतमोजाल पळे ।
दूर दूर; पथ सगळे ।
विशद यात्रिकाला ॥ ध्रु० ॥ २ ॥

योजि तमीं विषयेषू ।
पापात्मा हारि असू ।
तेजानें परि येशू ।
हांकि दूर त्याला ॥ ध्रु० ॥ ३ ॥

## ख्रिस्ताचा सहवास.

पद.

तव सहवास घडावा । प्रिय ख्रिस्ता ।
क्षण विरह नसावा ॥ ध्रु० ॥

राहो सुंदर सदनीं नगरीं ॥
किंवा रानीं पर्वतकुहरीं ॥
देह प्रभो हा माझा ।
कोठेंही मग स्वर्गच जीवा ॥ १ ॥

घृतपायसमधु लाधो खाया ॥
पृथुक रुक्ष वा मज फांकाया ॥
तूं जवळीं मम असतां ।
अमृतानुभवचि मज तो व्हावा ॥ २ ॥

मृदुल फुलांची सुखकर शय्या ॥
किंवा प्रस्तर-खंड निजाया ॥
हृदया तव टेंकोनी ।
असतां, कष्ट न शब्दहि ठावा ॥ ३ ॥

हे मम कंदा सर्व सुखाच्या ॥
घे ! घे ! माझें तन मन वाचा ॥
ख्रिस्ता ! ख्रिस्ता ! ख्रिस्ता ! ।
अविनाशी तूं मात्र विसावा ॥ ४ ॥

## माझें वेड.

पद.

वेडा झालों खरा। गड्यांनों।
वेडा झालों खरा ॥ ध्रु० ॥

ख्रिस्तासाठीं त्यजिलें सुंदर एकुलत्या लेंकरा।
प्रेमल भार्या परंतु त्यजिलें कोमल तीच्या करा ॥ १ ॥


घरांत वाजे नकारघंटा दाद न त्याची जरा।
जनलज्जेचा कधींच केला एक मूठभर चुरा ॥ २ ॥

वर खालीं मम मागें पुढतीं ख्रिस्त उभा साजरा।
एक क्षण प्रभु त्यजी न माझ्या रम्य हृदयमंदिरा ॥३॥

शिव्या शाप द्या मारा झोडा करा जीव घाबरा।
ह्या वेडांतुन होइन नच मी कालत्रयिंही बरा ॥ ४ ॥

प्रभुप्रीतीचें वेड भयंकर एकवार जरि नरा।
लागे तरि मग त्यजा तयाला उपाय ना दूसरा ॥ ५ ॥

येशू माझा मी येशूचा कोण कुणाची धरा।
वेडा किंवा असो शहाणा प्रिय मी त्या गुरुवरा ॥ ६ ॥



## बालख्रिस्त.

चला! चला ! बघुं बाळ चला !
झणिं पद उचला! तुह्मि पद उचला !
नका घालवूं वेळ! चला! ॥ ध्रु० ॥

मेषपाल ते आतुर झाले ।
परस्परां लोटीतचि आले ।
त्याच स्थला । जिथ प्रभु निजला ।
झणिं पद उचला । चला! चला! ॥ १ ॥

दर्शनार्थ जीं वेडीं झालीं ।
हृदयें त्यांचीं पूर्ण निवालीं ।
नयनजला । किति पूर अला ।
झणिं पद उचला । चला चला! ॥ २ ॥

विकल्पध्वान्ता दुरीं पळविता ।
कोठें उगवे सांगा सविता ।
पुसत मुलां । मनुजां सकलां ।
झणिं पद उचला ॥ चला चला! बघुं ॥ ३ ॥

पर्वत खिंडी सरिता रानें ।
यांतुन मागी येति श्रमानें ।
त्या प्रभुला । भजण्या विमला ।
झणिं पद उचला । चला चला बघुं ॥ ४ ॥

देवदूत गातात नाचती ।
प्रसन्न सृष्टी कशी हासती ।
नरतनुला । बघुनी विभुला ।
झणिं पद उचला । चला चला ॥ ५ ॥

ख्रिस्त ख्रिस्त जय ! ख्रिस्त ख्रिस्त जय ! ।
गेला संशय दुरित दुःख भय ।
क्षमातला । ये स्वर्गतुला ।
झणिं पद उचला । चला चला ॥ ६ ॥

धी-श्री-कीर्ती नको नको ती ।
जगन्मित्र मी; चरणीं प्रीती ।
दे मजला । घे हृदय तुला ।
झणिं पद उचला । चला चला ॥ ७ ॥

## प्रभुचा संग.

### पद.

सुखकर एक प्रभूचा संग ॥ ध्रु० ॥
संगें प्रभुच्या सुचती हृदया विमलप्रीतिचे रंग ॥ १ ॥
प्रभुसंगाला शिवति न केव्हां वियोग आशाभंग ॥२॥
ख्रिस्तपदांबुज अक्षय रसयुत मन्मन हो इह भृंग ॥३॥
काय जगीं ? तत्समागमीं तीं सर्व सुखें! हो दंग ॥४॥

## पद.

### तुझा हात सोडून कोठें जाऊं ?

कर सोडुन कोठें जाऊं मी दीन तुझा प्रभुराया ।। ध्रु० ।।

हे गहनदुर्ग तवसंगें क्रीडावनसम मज होती ।।
लोटितों व्याघ्रवृक हस्तें दूर नसे मजला भीती ।।
हें दार मृत्युचें रम्या वाटचि बा स्वर्गगृहा ती ।।
तूं दाविशि जेथें तेथें खिस्ता मज शांती प्रीती ।। चाल ।।

मम होतां मान तुला तो ।। किति प्रेमें येउन कथितों ।।
किति आत्मा रंगुन जातो ।। तव प्रेमल वदन पहाया ।। १ ।।

सुख माझें शतगुण करिशी गुजगोष्टी ऐकुन देवा ।।
मी श्रमतां अपुल्या हृदयीं मज देशी पूर्ण विसावा ।।
किति जपशी कीं मज वारा दुःखाचा नच लागावा ।।
तवसंगें दिन मम जातो केव्हां तो कोणा ठावा ।। चाल ।।

किति वेळां पद घसरावें ।। तूं प्रेमें तैं उचलावें ।।
मम मुखही कुरवाळावें ।। जीवन मज द्यावें प्याया ।। २ ।।

हे सर्व जगाच्या नाथा बघुं तूझ्या करचरणाला ! ।। हें रक्त ! पुरे रे ! देवा ! गहिंवर ह्या दासा आला ।। मी सोडिन नच तुज कोणी चर चर जरि कंठहि चिरिला ।। जरि चुकुनी फिरलों बापा तरि ओढीं मज हृदयाला ।। चाल ।।

प्रिय ख्रिस्ता ! माझ्या ख्रिस्ता ! । मम आशासौख्य-
समस्ता । ही प्रीति न जावो अस्ता ॥ मज दुसरें नच
मागाया ॥ ३ ॥ कर सोडुन कोठें जाऊं ॥

पद.

पण आई कोठें आहे ?

कां खिन्न मुला ? मौज पहा रम
येथें ! ॥ "पण आइ कुठें सांगा तें ॥ ध्रु० ॥
चल देतों घे रम्य नभःपुष्पांतें ! ॥
"पण आइ कुठें सांगा तें ॥ चल दावीतों
सर्व जगत्प्रसरातें ॥ "पण आइ कुठें
सांगा तें ॥ चाल ॥ घे गोड सुधेचा
ठेवा ॥ हा कल्पतरूचा मेवा ॥ तव
जीव अतां रंगावा ॥ तो येशूचा भक्त
ह्मणे परि त्यातें ॥ पण आइ कुठें सांगा तें ॥ १ ॥



## आरती.

जय येशो जय तारक जय जय विश्वेश ॥
जय जय सगुणपरात्मन् पूरितजनताश ॥ ध्रु० ॥
धृतनररूपं वंदे उद्धृतभूभारं ॥
सदसद्व्यक्तिचरित्रं ख्रिस्ताख्यं सारं ॥ जय० ॥
कोऽहं का सा पृथ्वी कः स्वर्गो देव ॥
येशो भाति समस्तं युष्मद्भूत्यैव ॥ जय० ॥
भो भो जनक नराणां पतितजनोद्धारं ॥
तव वात्सल्यं प्रेक्षे जगति धृताकारं ॥ जय० ॥
येनाऽहं निहितात्मा तवपदविभवेऽस्मि ॥
तत्कुरु दासोऽहं तव तवसंगमकामी ॥ जय० ॥



मुंबई-“निर्णयसागर” छा. छा. १८९.